जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१५/०१/२०२४
## दि.१४/०१/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

**पो.स्टे.गुरनं./कलम** लोणीकंद पो स्टे ३२/२०२४,भादविक ३०२,२०१,१८२

**फिर्यादी** प्रकाश आव्हाळे, पोलीस अंमलदार, लोणीकंद पोलीस ठाणे,पुणे शहर

**आरोपीत** अमोलसिंग मुरली जाधव,वय २६ वर्ष,रा.महेश गोरे यांचे भाडयाचे खोलीत,फुलगांव,ता.हवेली, जि.पुणे (अटक)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दिनांक २८/१०/२०२३ रोजी सकाळी ०८/०० वा.ते दुपारी १४/०० वा.चे दरम्यान फुलगाव, ता.हवेली,जि.पुणे ते मांढरदेवी ते वाई रोडवरील घाटात ता.वाई,जि.सातारा

**तपशिल** लोणीकंद पो स्टे मनुष्य मिसींग १९३/२०२३ अन्वये मिसिंगचे झाले तपासाचे चौकशीअंती यातील नमुद आरोपीत याचे मोबाईल नंबरचे तांत्रिक विश्लेषण केल्यानंतर व तो राहत असलेल्या घराच्या परिसरात केलेल्या एकंदरीत चौकशीचे अवलोकन करता,त्याचेवर संशय बळाविल्याने त्यास ताब्यात घेवुन कशोसिने चौकशी करता,त्याने त्याची पत्नी सौ.ललिता अमोलसिंग जाधव,वय ३८ वर्ष,रा.सदर ही त्याचेपेक्षा वयाने मोठी असल्याने तो तीचेसोबत लग्न करण्यास तयार नसताना,केवळ आई वडीलांचे व इतर नातेवाईक यांचे दबावामुळे लग्न केले होते. लग्न झाल्यानंतर पत्नी ललिता हिचेसोबत त्याचे पटत नसल्याने तीचेसोबत त्याची नेहमी भांडणे होत असल्याने व ती सोडचिठ्ठी देण्यास तयार होत नसल्याचा राग मनात धरुन तीस संपविण्याचे उद्देशाने,त्याने सौ.ललिता हिस दिनांक २८/१०/२०२३ रोजी सकाळी ०८/०० वा.मांढरदेवीचे दर्शनाला जायचे कारण सांगुन,तीला फुलगाव येथील पेट्रोल पंपाजवळ बोलावुन घेवुन,तेथुन दोघे ओला कारने मांढरदेवी मंदिराच्या जवळ गेल्यावर मंदिराकडे जाणा-या रोडवर घाटात असताना,त्याने ड्रायव्हरला मंदिरा जवळील पार्कीगमध्ये कार लावुन तेथेच थांबण्यास सांगितल्या नंतर ते दोघे घाटातुन मंदिराच्या दिशेने चालत येत असताना,दुपारी १४/०० वा.घाटातील रोडच्या कडेला दोघे गप्पा मारत थांबले होते. काही वेळाने त्याठिकाणी आजु-बाजुला कोणीही नाही हे पाहुन व सौ.ललिता हिचे लक्ष नसताना,त्याने अचानक तीस दरीच्या दिशेने जाणा-या डोंगर उतारावर ढकलुन दिले. त्यावेळी त्याने वाकुन पाहिले असता,ती घाट रस्त्यावरुन डोंगर उतारावर खालच्या दिशेने अंदाजे २० फुट अंतर असलेल्या झाडा-झुडपात जावुन अडकली. त्यामुळे तो स्वतः पुन्हा डोंगर उतारावरुन चालत त्याची पत्नी अडकलेल्या झाडा-झुडपा पर्यंत जावुन तेथे तीचा साडीच्या सहाय्याने गळा आवळुन,तीला जीवे ठार मारले असल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच त्याने तीचे प्रेत डोंगर उतारावरुन ढकलुन देवुन,पुरावा नष्ट करुन ती हरविल्याची खोटी तक्रार लोणीकंद पोलीस स्टेशन येथे दिली.

**त.अंमलदार** वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विश्वजीत काईंगडे ८८८८००१२३४

२

**पो.स्टे.गुरनं./कलम** कोंढवा पो स्टे ४३/२०२४,भादविक ३९२,३४

**फिर्यादी** एक नागरीक,वय-२२,रा.वडगाव-बुद्रक,पुणे

**आरोपीत** मोटार सायकलवरील तीन अनोळखी इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१४/०१/२०२४ रोजी रात्री ०२/१५ वा. बोपदेव घाटा माथ्यावर कोंढवा-बुद्रक,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी त्यांचे मित्राहस मोटार सायकलवरून फिरण्यासाठी जात असताना,नमुद वेळी व ठिकाणी बोपदेव घाट येथील घाटमाथ्यावर थांबले असताना,एका मोसावरुन आलेल्या तीन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांना तुम्ही एवढया रात्री घाटात काय करत आहेत असे म्हणुन त्यांचे हातातील चाकु व गिलोर दाखवुन,फिर्यादी यांचेकडे पैशाची मागणी करुन,त्यांचेकडे पैसे नसल्याने त्यांनी फिर्यादी यांचे मोटार सायकलची चावी घेवुन,गाडीत पेट्रोल नसल्याने,फिर्यादी यांचा मित्र सुयश सोनवणे यास गाडीवर बसवुन,सासवड रोडवर असलेल्या ज्ञानेश्वरी एच.पी. पेट्रोल पंपावर घेवुन जावुन,सुयश याचेकडुन जबरदस्तीने ५०५/- रुपयेचे पेट्रोल भरुन घेवुन, फिर्यादी यांची मोटार सायकल क्र.एमएच/१५/जीई/४१३९ ही जबरी चोरी करून घेवुन गेले आहेत.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. रत्नदिप बिराजदार ९४२१४४४४५५

**३**

**पो.स्टे.गुरनं./कलम** कोरेगांव पार्क पो स्टे ०७/२०२४,भादविक ३०७,३२३,५०४,३४,ऑर्म अॅक्ट ४(२५),महा.पो.का. कलम ३७(१)१३५

**फिर्यादी** अक्षय राजगुरु,वय-२९ वर्षे,रा.स.नं.४२,कोरेगाव पार्क,पुणे

**आरोपीत** (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१३/०१/२०२४ रोजी २२/०० वा.ते २२/३० वा.चे दरम्यान साऊथ मेन रोड,संत गाडगे महाराज वसाहत समोर वडाचे झाडा जवळ,कोरेगाव पार्क,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी थांबले असताना,यातील नमुद इसमांनी आपसात संगनमत करून,पुर्वी झालेल्या भांडणाच्या कारणावरुन फिर्यादी यांना तु माझ्याकडे खुन्नसने का पाहतो असे म्हणुन लाथा-बुक्यांनी मारहाण करुन,तुला आज ठेवणार नाही,एकदाच संपवुन टाकतो, आम्हाला आत मध्ये जावे लागले तरी चालेल असे म्हणुन फिर्यादीस जीवे ठार मारण्याचे उद्देशाने त्यांचेकडील चाकुने फिर्यादी यांचे पोटात व मांडीवर वार करुन तसेच लोखंडी धारधार हत्याराने डोक्यावर मध्यभागी मारुन,फिर्यादी यांना गंभीर जखमी करुन,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे.

**त.अंमलदार** सहा.पोलीस निरीक्षक, राहुल गिरमकर ८८०५५७३७३३

**४**

**पो.स्टे.गुरनं./कलम** लोणीकंद पो स्टे ३४/२०२४,भादविक २७९,३३८,३०४(अ),मो.वा.अधि.१९८८,क.११९/१७७,१८४, १३४(अ)(ब)

**फिर्यादी** रोहन थोरात,वय २१ वर्ष,रा.केसनंद,वाघोली रोड,केसनंद,पुणे

**आरोपीत** अज्ञात वाहन चालक (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१४/०१/२०२४ रोजी दुपारी १३/२५ वा.केसनंद-थेऊर रोडलगत असणा-या यशराज हॉटेल जवळ, ता.हवेली,जि.पुणे

**तपशिल** यातील फिर्यादी यांचे वडील ज्ञानेश्वर हरिभाऊ थोरात वय ५१ वर्षे रा.सदर हे मोटार सायकलवरुन केसनंदवरुन कोलवडी येथे नवीन खुर्चीच्या ऑर्डरचे मोजमाप घेण्यासाठी जात असताना,नमुद ठिकाणी कोणत्यातरी अज्ञात वाहन चालकाने,त्याचे ताब्यातील वाहन हे वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोटार सायकलस्वार ज्ञानेश्वर थोरात यांना जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन, अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला.

**त.अंमलदार** पोलीस अंमलदार, देवकर ९८२३०९०२९९

**५**

**पो.स्टे.गुरनं./कलम** कोरेगांव पार्क पो स्टे ०६/२०२४,भादविक ३५३,३२३,५०४

**फिर्यादी** दशरथ सावंत, पोलीस अंमलदार, कोरेगाव-पार्क पोलीस स्टेशन पुणे शहर.

**आरोपीत** चारचाकी गाडीवरील तृतीय पंथीय चालक (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दिनांक १४/०१/२०२४ रोजी रात्री ०२/०० वा.दुर्गा कॅफे समोर,लेन नं.६,कोरेगाव पार्क,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी हे लेन नं.६,कोरेगाव पार्क,पुणे येथे रात्रीची गस्त घालत असताना,दुर्गा कॅफे समोर रस्त्यावर मध्यभागी उभी असलेली चारचाकी गाडीवरील तृतीय पंथीय चालक यास त्याची कार बाजुला घेण्यासाठी सांगितल्याचे कारणावरून, त्याने फिर्यादीस अपशब्द वापरून,मोठ-मोठयाने आरडा-ओरडा करुन,फिर्यादीचे अंगावर धावुन आला. त्यावेळी फिर्यादी हे त्यांचे मोबाईल मध्ये शुटींग करत असताना,फिर्यादीचा मोबाईल हिसकाऊन तो फेकुन देऊन फिर्यादी हे करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा आणला. तसेच तेथील नागरीक यांना देखील शिवीगाळ करुन हाताने मारहाण केली आहें.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. एस.ए.नराळे ८८८८३१८८११

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ७९/२०२४,भादविक ४५२,४२७,३२३,५०४,५०६(२),आर्म ॲक्ट ४(२५),मपोका कलम ३७(१)(३),१३५,क्रिमीनल लॉ ॲमेन्टमेंट ॲक्ट ३ व ७ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय २२ वर्षे,रा.गंगानगर,फुरसुंगी,हडपसर,पुणे |
| **आरोपीत** | १.दिप दिलीप कसबे,वय-२० वर्ष रा.महात्मा फुले वसाहत,गंगानगर,हडपसर,पुणे २.अभयसिंग सिंकदरसिंग जुनी,वय-२० वर्ष,रा.गंगानगर,हडपसर,पुणे (अटक) व इतर एक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १३/०१/२०२४ रोजी रात्री २०/३० वा.गल्ली नं.१५,सुखकर्ता कॉलनी,गंगानगर,फुरसुंगी, हडपसर,पुणे येथील ट्रेडिंग होलसेल दुकानात |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे आईसह त्यांचे होलसेल किराणा दुकानात असताना,यातील नमुद इसमांनी त्यांचे दुकानात त्याचे कमरेला असलेले धारदार लोखंडी हत्यार बाहेर काढुन फिर्यादी यांना जीवे ठार मारण्याची धमकी देवुन,दुकानातील काऊंटरच्या दरवाज्यावर लाथा मारुन, दरवाजा तोडुन,त्याचे नुकसान केले. त्यानंतर दुकानात प्रवेश करुन,फिर्यादीस हाताने मारहाण करून,त्यांच्या हातातील धारदार शस्त्रे हवेत फिरवुन,शिवीगाळ करून,आमच्याशी कोणी पंगा घ्यायचा नाही,नाहीतर कोणालाच जीवंत सोडणार नाही अशी धमकी दिली. त्यावेळी आस-पासचे नागरीकांनी त्यांची घरे व दुकानदारांनी त्यांची दुकाने बंद करून घेतली आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.पवार८७८८२३२४१९ |

## प्रेस नोट दि.१५/०१/२०२४

## दि.१५/०१/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते १३/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

७.

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे माळवाडी पो स्टे २३/२०२४,भादविक ३०७,३९७,३२३,५०४,५०६,३४महा.पो.अधि.क १४२ प्रमाणे |
| **फिर्यादी** | अक्षय झेंडे वय २८ वर्षे रा.कर्वेनगर पुणे |
| **आरोपीत** | तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०१/२०२४ रोजी १२/३० वा.चे सुमा.चांदणी बार,कर्वेनगर,पुणे चे समोर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचा मित्र स्वप्नील मारणे यास आणण्यासाठी नमुद ठिकाणी गेले असता सदर गोष्टीचा राग धरून नमुद तीन इसम यांनी फिर्यादी यांचा मित्र यास शिवीगाळ करून लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. तसेच फिर्यादी यांना जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने डोक्यात बियरच्या बाटल्या मारून गंभीर जखमी केले. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक सचीन पाटील ९००४४६५९१८ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**